परिशिष्ट " ब "

ज्ञापन

मेमोरँडम ऑफ असोसिएशन.

१) संस्थेचे नांव :- श्री. आंबुर्लीत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ " बंजारा कॉलनी औरंगाबाद.

२) संस्थेच्या कार्या :- बंजारा कॉलनी, दत्त मंदीरा जवळ बहादूरपूरा औरंगाबाद. लयाचा पत्ता. द्वारा. सौ. शांताबाई शिवलाल जाधव.

३) संस्थेचे उद्देश :-

१) ग्रामातील्या भागात शिक्षणाचा प्रसार व प्रचार व्हावा या हेतूने बालवाड्यां, अंगणवाड्या, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालय उच्च महाविद्यालय, सुरु करणे व चालविणे.

२) प्रौढ शिक्षण वर्ग चालविणे.

३) अनाथ आश्रम, वसतीगृह सुरु करणे व चालविणे.

४) महिलांच्या सर्वांगीन विकासाच्यां दृष्टीने विविध योजना राबविणे.

५) आरोग्य विषयक सल्ला देण्यासाठी आरोग्य शिबीरे भरविणे व त्याची माहिती देणे.

६) वाचनालय सुरु करणे व चालविणे.

७) हुशार व होतकरु, गरिब विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या शिक्षणासाठी सर्वोतोपरी साहय करणे. इत्यादी.

४) " श्री. आंबुर्लीत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ " बहादुर पुरा औ,बाद. या संस्थेच्या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहु संस्थेची व्यवस्था व कारभार सोपविण्यात आलेला आहे अशा पहिल्या कार्यकारी मंडळांच्या सभासदांची संपूर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

...२....

अर्ज क्र. 46921/24 ........ अन्वये

अर्जदाराचे नांव

नक्कलेचा अर्ज आला त्या दि. 18/11/24

नक्कल तयार दि. 27/11/24

नक्कल दिली तो दि.

रुपये. 160/- दि. 27/11/24 रोजी मिळाले

27/11/2024

Superintendent
Public Trusts Registration Office
Chhatrapati Sambhajinagar Region,
Chhatrapati Sambhajinagar

| अ.क्र. | नांव | पद | वय | पत्ता | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. गुन्हा लक्ष्मण राठोड | अध्यक्ष | ४५ | टेकडी डोनगाव तांडा, पो. पोरगांव ता. पैठण जि. औ.बाद | शेती | भारतीय |
| २) | श्री. सिताराम दगडुजी तायडे | उपाध्यक्ष | ३५ | रा. जामखेड जि. आंबड | शेती | =*= |
| ३) | श्री. प्रलाल जयराम जाधव | सचिव | ३० | रा. अंबड जि. xxxxxxx जांबुवंत प्रि. प्रेस. जालना | व्यापार | =*= |
| ४) | सौ. शांताबाई शिवलाल जाधव. | सहसचिव | २५ | बंजारा कॉ. औ.बाद | =*= | |
| ५) | श्री. संपत दामू राठोड | कोषाध्यक्ष | ३३ | अंबड जि. जालना | =*= | |
| ६) | श्री. शंकर जयराम जाधव | सदस्य | ३२ | जोगेश्वरवाडी ता. अंबड जि. जालना. | =*= | |
| ७) | सौ. द्वकाबाई प्रलाल जाधव | =*= | २४ | रा. अंबड जि. जालना. | =*= | |

५) आम्ही सहया करणारे " श्री. जांबुवंत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ " बंजारा कॉलनी औ.बाद. चे सदस्य जाहीर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रिय केलेली संस्था अस्तित्वांत आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येऊन " श्री. जांबुवंत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ " औरंगाबाद ही संस्था आज दिनांक १-३-९९ रोजी स्थापन केली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रांत सहया केल्या आहेत.

| अ. क्र. | सभासदांचे नांव | पत्ता | सहया |
|---|---|---|---|
| १) | श्री. मुंन्हा लक्ष्मण राठोड. | टेकडी डोनगाव तांडा, पोपोरगाव ,ता. पैठण जि. औ.बाद. | |
| २) | श्री. सिताराम दगडुजी तायडे. | जामखेड ता. अंबड जि. जालना. | |
| ३) | श्री. प्रलाल जयराम जाधव | जांबुवंत प्रिंटींग प्रेस अंबड जि. जालना. | |
| ४) | सौ. शांताबाई शिवलाल जाधव. | बंजारा कॉ.औ.बाद. | |
| ५) | श्री. संपत दामू राठोड. | रा. अंबड जि. जालना. | |
| ६) | श्री. शंकर म जयराम जाधव. | जोगेश्वरवाडी ता. अंबड जि. जालना. | |
| ७) | सौ. द्वकाबाई प्रलाल जाधव. | गिनिंग इंडस्ट्रील सेल. अंबड जि. जालना. | |

स्थळ :- औरंगाबाद.

दिनांक :- २-३-९९ वरील सहया करणा-यांना मी ओळखतो त्यांनी माझ्या समक्ष या विधानपत्रावर सहया केल्या आहेत.

( विशेष कार्यकारी दंडाधिकारी / वकील / नोटरी यांची सही व शिक्का )

१) २)

ALAFKHAN
Special Executive Magistrate
Aurangabad

Rajeev M. Joshi
B.Com. LL.B.
Advocate

परिशिष्ट " क "

( श्री. जांबुवंत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ बंजारा कॉलनी बहादूरपुरा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद या मंडळाची नियम व नियमावली )

## नि य म व नि य मा व ली

१) नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-

व्याख्या :- मंडळाच्या नियमावलीत व उद्देशामध्ये जे न समण्यासारखे शब्द आहेत त्यांच्या व्याख्या खालील प्रमाणे दिल्या आहेत. व त्या उद्देशाला व नियमावलीला धरून आहेत.

१. मंडळ:- म्हणजे श्री जांबुवंत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ बंजारा कॉलनी , बहादूरपुरा औरंगाबाद.ही संस्था. ( संस्थेचे नांव राहील. ) शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी स्थापन केलेले मंडळ.

२. अजीव सभासद:- वार्षिक वर्गणी रुपये १५१/- भरणारा या मंडळाचा अजीव सभासद समजण्यांत येईल.

३. सर्वसाधारण सभासद:- वार्षिक वर्गणी रुपये ५१/- देणारा व्यक्ती या मंडळाला सर्वसाधारण सभासद समजण्यांत येईल

४. सभासद:- मंडळाने ठरवुन दिलेला विहित नमुण्यांत अर्ज मंडळाने ठरवुन दिलेली फिस भरणारा सभासद समजण्यांत येईल.

५. सभा :- मंडळाच्या हितासाठी व विकासासाठी मंड[illegible] रितसर बोलावलेली बैठक म्हणजे मंडळाची [illegible]

६. कार्यकारी मंडळ :- अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव, [illegible] व कोषाध्यक्ष , व दोन सभासद मिळुन कार्यकारी मंड[illegible]

७. बॅंक:- कायद्या प्रमाणे मान्यता असलेली कोणतीही बँ[illegible]

८. हिशोबाचे वर्ष:- १ एप्रील पासुन सुरू होऊन ३१ मार्च संपणारा कालावधी.

२) कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित राहील.

३) हिशोबाचे वर्ष:- १ एप्रील ते ३१ मार्च हिशोबाचे वर्ष .

४) सभासदत्व व त्यांच्या नोंदणीची पध्दत :-

१८ वर्ष पूर्ण झालेल्या कोणत्याही भारतीय ना[illegible]

२. सा सभेला सर्व प्रकारचे सभासद भाग घेऊ शकतील.

३. मंडळाच्या हितासाठी जे विषय सभेपुढे येतील व तयावर अध्यक्षांच्या परवानगीने त्या ठरावास मंजुरी देणे अगर ना देणे.

४. वार्षिक हिशोबपत्र मंजुर करणे, व पुढील वर्षाच्या अंदाज-पत्रकाला मान्यता देणे.

५. कार्यकारी मंडळाच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे.

६. दर पांच वर्षानी कार्यकारी मंडळाची निवड गुप्तमतदान पध्दतीने करणें.

७. २/:३ सभासदांच्या बहुमताने मंडळाच्या नियमांत व उद्देशांत दिल करणे.

८. मंडळाच्या हितासाठी व मंडळाचा विकास करण्यासाठी ×××××××××××××××× सभासदांनी विनंती केल्यास अध्यक्षांनी अशी सभा ××××××××××××××× १५ दिवसाच्या आंत अध्यक्षांनी आयोजित केली पाहीजे जर अध्यक्षांनी सभासदांच्या तोंडी किंवा लेखी विनंतीनुसार अशी सभा आयोजित केली नाही तर दोन सभासदांच्या सहीने नोटीस काढून अशी सभा आयोजित करण्यांत येईल. या सभेसाठी नोटीस मध्ये सभेला विषय, ठिकाण, वेळ. व दिनांक मांडण्यांत येईल. सभासदाने नोटीस घेण्यांला नकार दिला तर पोष्टाच्या दाखल्याने नोटीस पाठविण्यांत येईल.

प्रभाकर जाधव
संपत दामु राठोड
शिवराम दगडु नाईक

८) <u>सर्वसाधारण सभेचीसुचना व गणसंख्या :-</u>

१५ दिवस अगोदर सर्व सभासदांना सचिव नोटीस बुक रजि. मध्ये नोंद घेऊन पाठवितील.व अध्यक्षांची परवानगी घेऊन सचिव नोटीस काढतील व जे सभासद नोटीस घेण्याला नकार देतील त्यांना नोटीस रजि. पोष्टाने पाठविण्यात येईल. किंवा हात पोंच नोटीस देण्यांत येईल. या सभेला एकुन सभासदांच्या २/३ सभासद हजर राहील्यास सभेची गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यांत येईल.×× गणसंख्ये अभावी सभा तहकुब करण्यांत येईल. व तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा बोलावण्यांत येईल. या सभेला कोरमचे बंधन राहाणार नाही. या सभेच्या नो. मध्ये सभेचा विषय, वेळ, ठिकाण व दिनांक

९) विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :-

आवश्यकता वाटेल तेव्हा सचिव व अध्यक्षांच्या परवानगीने संमतीने व कार्यकारी मंडळाच्या बहुमताने सभा बोलावण्यांत येईल. या सभेला आवश्यकतेनुसार विषय ठेवण्यांत येईल. या सभेची नोटीस सभेच्या आठ दिवस अगोदर अध्यक्षांच्या परवानगीने सचिव नोटीस बुकावर नोंद करून पाठवतील. ज्या सभासदाने नोटीस घेतली नाही त्यांस रजि. पोष्टाने नोटीस पाठविली जाईल. या सभेच्या कोरमसाठी २/३ सभासदांची आवश्यकता राहील. या सभेच्या नोटीसमध्ये सभेचा विषय, वेळ, ठिकाण, दिनांक व उद्देश नमुद करण्यांत येईल. या सभेने मंजुर केलेले ठराव कार्यकारी मंडळाव[र] बंधनकारक राहातील. अशी सभा वर्षातुन दोन वेळेला बोलावल्या जाईल.

१०) संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी व त्यांची रचना :-

संस्थेचे कार्यकारी एकून ७ सभासदाचे राहील.
१. अध्यक्ष, २. उपाध्यक्ष, ३. सचिव ४. सहसचिव व
५. कोषाध्यक्ष व दोन सभासद असतील.

११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणुकीची पध्दत :-

१. कार्यकारी मंडळाचा कार्यकाल एकून पांच वर्षाचा राहील.
२. निवडणुक गुप्त मतदान पध्दतीने घेतली जाईल.
३. एक वर्षापासुन सभासद असलेल्या सभासदाला मतदान करता येईल.
४. दोन वर्षापासुन सभासद असलेल्या सभासदाला उमेदवारी दिली जाईल.
५. संस्थेची थकबाकी असलेल्या सभासदाला निवडणुकीत भाग घेता येणार नाही.

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-

कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी एकुन पांच अध्यक्ष, उपाध[्यक्ष], सकचव, सहसचिव, व कोषाध्यक्ष

१. अध्यक्ष :-

सर्व सभाचे अध्यक्षस्थान भुषविणे. संस्थेचे सर्व काम[...] विण्यांची जबाबदारी अध्यक्षांची रा[...]

व विकासाची जी कांही कामे असतील त्यास योग्य आदेश देऊन काम करुन घेणे. संस्थेच्या सर्व कारभारा८र लक्ष देणे. सचिवांना सभेच्या नोटीसा काढायला लावणे. व सभा आयोजित करणे. मतदानाच्या वेळी एक अधिकचे मत देण्याचा अधिकारही अध्यक्षाला राहील.

२. उपाध्यक्ष :-

अध्यक्षांच्या गैरहजेरीमध्ये अध्यक्षांची कामे करणे. व अध्यक्षांना संस्थेच्या सर्व कामांत मदत करणे.

३. सचिव :-

१. अध्यक्षाने आदेश दिल्यास नोटीसा काढुन सभा बोलावणे.
२. संस्थेचा संपूर्ण पत्रव्यवहार करण्याची जबाबदारी सचिवांची राहील.
३. संस्थेच्या कर्मचा-यांवर लक्ष देणे.
४. कांही तक्रार असल्यास त्यांचे निवारन करणे.
५. संस्थेच्या वतीने कोर्ट कचेरीचे कामे करणे.
६. दारोजचे हिशोब तपासुन त्यावर सही करणे.
७. वार्षिक अहवाल तयार करणे , व सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.
८. संस्थेच्या मालमत्तेचे रक्षण करणे. खर्चावर नियंत्रण ठेवणे.
९. संस्थेच्या हितासाठी नेहमीच काम करणे.

४. सहसचिव:-

सचिवांच्या गैरहजेरीत सचिवांची कामे करणे. संस्थेच्या सर्व कामांत सचिवांना मदत करणे.

५. कोषाध्यक्ष :-

संस्थेच्या हिशोबावर नियंत्रण ठेवणे. हिशोब लिहीणे, तपासणे. आणि हिशोब तपासल्यावर सचिवासमोर ठेवणे. हिशोबांच्या पुस्तकावरुन वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे. रक्कमांची देवाण घेवाण करणे. ऑडिट मध्ये कांही त्रुटी आढळुन आल्यास त्याची पूर्तता करणे. संस्थेचा सर्व आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी कोषाध्यक्षांची राहील.

६. सभासद:-

कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेच्या सभांना हजर रहाणे व निवडणुकीच्या वेळी मतदान करणे.

Charity Commissioner
धर्मादाय आयुक्त
सहायक धर्मादाय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर
Chhatrapati Sambhajinagar

(७) (७)



आकारलेली वार्षिक फिस मंडळाने ठरवुन दिलेल्या विहीत नमुन्यात अर्ज भरून दिल्यास व त्याला कार्यकारी मंडळाने बहुमताने मान्यता दिल्यास त्या व्यक्तीला या मंडळाचे सभासद होता येईल. ज्या व्यक्तीला अजीव सभासद किंवा सर्वसाधारण सभासद होणे आहे त्या प्रमाणे ठरवुन दिलेली वार्षिक फिस भरावी लागेल. व त्या नंतर त्या व्यक्तीचे नांव सभासद रजिष्टरमध्ये नोंदविल्या जाईल.

५) सभासदाचे प्रकार :-

१. अजीव सभासद २. सर्वसाधारण सभासद. ३. सभासद.

१. अजीव सभासद:- अजीव सभासदाला वर्षाला १५१/- रुपये फिस भरावी लागेल.

२. सर्वसाधारण सभासद:- सर्वसाधारण सभासदाला वर्षाला ५१/- रुपये फिस भरावी लागेल.

३. सभासद:- सभासदाला वर्षाला ११/- रुपये फिस भरावी लागेल.

६) सभासदत्व रद्द होणे :-

१. सभासदाने राजीनामा दिल्यास.

२. सभासदाला मृत्यु ओढवल्यास.

३. अपंग , वेडा झाल्यास किंवा बिमार असल्यास.

४. मंडळाचे काम करण्यास असमर्थ ठरल्यास.

५. कार्यकारी मंडळाने त्याचे सभासदत्व बहुमताने रद्द केल्यास

६. मंडळाच्या तीन सभांना गैरहजर राहील्यास.

७. मंडळाचा भ्रष्टाचार केल्यास, अफरातफर केल्यास.

८. मंडळाच्या उद्देशाच्या हिताविरुद्ध वागल्यास.

९. अध्यक्षांची परवानगी न घेता सहा महिण्यापेक्षा अधिक काळ भारताच्या बाहेर राहील्यास.

१०. न्यायालयाने दोषी ठरवुन शिक्षा झाल्यास.

११. मंडळाने ठरवुन दिलेली वार्षिक वर्गणी न भरल्यास. मात्र नियमित वर्गणीची थकबाकी भरल्यास व त्यास कार्यकारी मंडळा बहुमताने मान्य केल्यास त्यास पुन्हा सभासदत्व दिल्या जाईल

प्रमाणित प्रत
संपत लक्ष्मण चाटे
शिवाजी नामदेव गाडे

७) सर्वसाधारण सभा चे अधिकार व कार्य :-

१. सर्व सभासदांची मिळुन सर्वसाधारण सभा ...
सभा मंडळाचा शेवटचा व अंतिम ...

१३) कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :-

कार्यकारी मंडळाची सभा वर्षातुन चार वेळा व तीन महिण्यातुन एकदा बोलावण्यांत येईल. व आवश्यकता वाटली तर व तातडिचे निर्णय घेण जरूरीचे असल्यास अध्यक्षांची परवानगीने सचिवा मार्फत अशा सभेची नोटीस काढुन अशी सभा घेतली जाईल. व सभेच्या १० दिवस अगोदर नोटीस काढण्यांत येईल. अध्यक्षांनी ~~अशी सभा न बोलावल्यास~~ १५ दिवसाच्या आंत अशी सभा न बोलावल्यास सभासदांच्या लेखी मागणी वरून अध्यक्षांनी अशी सभा न बोलावल्यास दोन सभासदांच्या सहीने नोटीस काढुन सभा बोलावण्यांत येईल.

१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-

कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना सभेच्या ८ दिवस अगोदर अध्यक्ष सचिवांच्या मार्फत नोटीस काढून किंवा हातपोच पत्राने कळवितील जे सभासद नोटीस घेण्याला नकार देतील त्यांना सभेची सुचना रजि. पोष्टाने पाठविली जाईल. या सभेला एकूण सभासदांच्या २/३ सभासद हजर असल्यास सभेची गणसंख्या पुर्ण झाली आहे असे समजल्या जाईल. गणसंख्या अभावी सभा तहकुब करण्यांत येईल . व तहकूब झालेली सभा त्यांच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर बोलावण्यांत येईल. या तहकुब झालेल्या सभेला गणसंख्याचे बंधन राहाणार नाही व अंतीम निर्णय घेण्यांत येतील सभेच्या नोटीसमध्ये सभेचा विषय , वेळ , ठिकाण व दिनांक नमुद करण्यांत येईल.

१५) कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-

१. कार्यकारी मंडळाची निवडणुक दर पांच वर्षांनी घेण्यांत येईल.
२. निवडणुक गुप्त मतदान पध्दतीने घेतल्या जाईल.
३. सभासदाकडे कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास तो सभासद निवडणुकीत पात्र समजल्या जाणार नाही.
४. निवडणुकीसाठी निवडणुक अधिकारी निवडणुकीची लेखी सुचना सर्व सभासदांना पात्र सभासदांना निवडणुकीच्या १५ दिवस अगोदर देईल.
५. कार्यकारी मंडळ निवडणुक अधिकाऱ्यांची नियुक्ती निवडणुकीच्या २१ दिवस अगोदर करील.

६. निवडणुकीच्या ५ दिवस अगोदर आवेदन पत्र स्विकारल्या जातील. व सभासदांची यादी जाहिर करण्यांत येईल.

७. ज्या सभासदाला मंडळाचे सभासद होऊन एक वर्ष झाले असेल त्याला मतदान करण्याचा अधिकार राहील. व ज्या सभासद दोन वर्ष झाले असतील त्यास निवडणुकीत उमेदवारी दिली जाईल.

१६) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-

१. संस्थेच्या सर्व व्यवहारावर लक्ष देण्याची जबाबदारी कार्य कारी मंडळाची राहील.

२. संस्थेतील कर्मचा-याची नियुक्ती करणे. त्यांना बढती देणे. काम करण्यांस असमर्थ ठरल्यास त्यास काढून टाकणे. व त्यां कामावर लक्ष देणे.

३. संस्थेच्या अंतर्गत चालणा-या अतर शाखावर नियंत्रण ठेवणे.

४. सर्वसाधारण सभेच्या ठरावांची अमलबजावणी व पूर्तता करणे.

५. संस्थेच्या हिताचे आवश्यक ते किरकोळ नियम तयार करणे.

६. सभासदांची यादी ठेवणे.

७. नविन कार्यकारी मंडळांची निवडणुक झाल्यास नविन कार्यकारी मंडळाची यादी संबंधीत कचेरी कार्यालयात पाठवुन बदल अर्ज मंजुर करुन घेणे.

८. संस्थेच्या जमा खर्चाचे हिशोब ठेवणे, व तपासणे. व सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

९. संस्थेच्या दैनंदिन कार्यावर लक्ष ठेवणे.

१०. तक्रारीची दखल घेणे व त्यावर आवश्यक ती कार्यवाही करणे.

११. संस्थेच्या हितासाठी नविन योजना तयार करणे.

१२. एखाद्या कामाबद्दल एखाद्या सभासदाला जास्तीचे अधिकार देणे.

१३. संस्थेच्या समित्या उपसमित्या स्थापन करणे.

१७) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरण्या बाबत :-

कांही कारणामुळे मंडळातील एखादे पद रिक्त झाले तर बाकीच्या सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभासदामधुन पद भरल्या जाईल. हे सभासदाचे पद पुढच्या निवडणुकी पर्यंत राहील व अशा सभासदाला मतदान करण्याचा अधिकार राही

१८) मंडळाचा निधी , मिळकत व विनियोग :-

सभासदांनी दिलेली वर्गणी , देणगी , सरकारी व निम-सरकारी अनुदान , एखादया संस्थेकडून किंवा व्यक्तीकडून घेतलेले कर्ज. अशा प्रकारे मंडळाजवळ जो पैसा येईल त्यास संस्थेचा निधी समजल्या जाईल. चॅरिटी शो, नाटक ईत्यादी प्रकारे सुध्दा निधी उभारता येईल. व हया जमा झालेल्या निधीचा उपयोग संस्थेच्या उद्देशासाठीच खर्च करण्यांत येईल. व जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत मंडळाच्या नावाने जमा करण्यांत येईल.

१९) उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद:- ( टक्केवारी प्रमाणे )

१. शैक्षणिक कार्यावर ५०/- टक्के खर्च.
२. वसतिगृहासाठी २५/- टक्के खर्च.
३. वाचनालयासाठी २५/- टक्के खर्च.
४. सामाजिक कार्यावर २५/- टक्के खर्च.

२०) कर्ज किंवा ठेवी संबंधी तरतूद:-

प्रल्हाद जाधव
सपत दामु राठोड
शिवराम काळूजी नाईक

मंडळाच्या हितासाठी व मंडळाच्या विकासासाठी गरज पडली तर एखादया संस्थेकडून , व्यक्तीकडून किंवा बँकेकडून कर्ज घेण्यांत येईल व त्यासाठी प्रथम मा. धर्मादाय सह आयुक्त यांची परवानगी घेतल्या जाईल.

२१) स्थावर मालमत्ता खरेदी व विक्री बाबतची तरतूद:-

संस्थेच्या उन्नतीसाठी कांही जमिन खरेदी करावयाची असल्यास किंवा कांही मालमत्ता विकावयाची असल्यास कार्यकारी मंडळाच्या संमेत ठराव संमंत करुन खरेदी किंवा विक्री चे कारभार करता येतील यासाठी प्रथम मा. धर्मादाय सह आयुक्त यांची परवानगी घेण्यात येईल.

२२ बँक खाते :-

मंडळाच्या उद्देशावर खर्च केल्या नंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत मंडळाच्या नांवाने जमा करण्यांत येईल. रक्कम काढण्याचा व रक्कम जमा करण्याचा व्यवहार अध्यक्ष, व सचिव यांच्या संयुक्त सहीने करण्यांत येईल. व या दोघापैकी एक गैरहजर असला तर कोषाध्यक्षांच्या सहीने बँकेचा व्यवहार करण्यांत येईल.

२३) सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-

सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १८६० चे चे कलम १५ नुसार संस्थेच्या सभासदांची एक यादी सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमावलीतील नियम १५ प्रमाणे अनुसुचि क्र. ६ चे नमुन्यांत ठेवण्यात येईल.

२४) नियमावलीतिल बदल करण्याची तरतुद:-

सभा नियमावलीत कांही बदल करणे आवश्यक वाटल्यास किंवा कांही उद्देश वाढवावयाचे असल्यास संस्थेतील एकुन सभासदांच्या २/३ बहूमताने सर्वसाधारण सभेत ठराव घेऊन आवश्यक ते नविन बदल नविन नियम करुन घेतल्या जातील. त्यासाठी रजि. अॅक्ट १८६० चे कलम १२ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करण्यांत येईल.

२५) मंडळाच्या नांवात व उद्देशात बदल करण्याची तरतुद:-

संस्थेच्या नांवांत किंवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास किंवा दोन संस्था एकमेकांत विलीन करावयाच्या असल्यास सार्वजनिक विश्वस्थ व्यवस्था अधिनियम १८६० चे कलम १२ व १२ अ प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल. व त्यासाठी सर्वसाधारण सभेमध्ये एकून सभासदांच्या २/३ सभासदांच्या बहुमताने ठराव संमत करण्यांत येईल. व झालेला बदल संबंधीत कार्यालयाला पाठविण्यांत येईल.

२६) संस्थेचे विसर्जन :-

संस्था कार्यकारणी मंडळ व्यवस्थित चालवित नसल्यास किंवा संस्था चालविणे कठीण झाल्यास व ती बंद करावी असे कार्यकारी मंडळाच्या बहूमताने ठराव संमत करून ठरल्यास २/३ सभासदांच्या बहुमताने संमत मंजुरी घेऊन मंडळाचे सर्व आर्थिक व्यवहार असतील ते सर्व व्यवहार पूर्ण करण्यांत येतील व मंडळाची शिल्लक मालमत्ता दुसऱ्यां त्याच दर्जाच्या समान असलेल्या संस्थेला दान म्हणुन देण्यांत येईल. व संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करण्यांत येईल.

....१०...

## -: दाखला :-

प्रमाणित करण्यांत येते की, सदर इनपमावलीही " श्री जाबुवंत महाराज शिक्षण प्रसारक मंडळ बंजारा कॉलनी बहादूरपुरा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद " या मंडळाच्या नियम व नियमावलीची सत्य प्रत आहे.

| अ.क्र. | सभासदाचे नांव | सह्या |
|---|---|---|
| १. | मुन्हा लक्ष्मण राठोड | [signature] |
| २ | सिताराम दगडूजी तायडे. | [signature] |
| ३. | प्रल्हाद जयराम जाधव. | प्रल्हाद जाधव |
| ४. | सौ. शांताबाई शिवलाल जाधव. | शांता जाधव |
| ५. | श्री. संपत दागू राठोड. | संपत दागू राठोड |
| ६. | श्री. शंकर जयराम जाधव. | [thumb impression] अ.ठसा |
| ७. | सौ दपळाबाई प्रल्हाद जाधव. | सौ. [illegible] जाधव |

Assistant Charity Commissioner, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, Chhatrapati Sambhajinagar Region

27/11/2024

Superintendent
Public Trusts Registration Office
Chhatrapati Sambhajinagar Region,
Chhatrapati Sambhajinagar